**कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग व त्या अधिनस्त कार्यालयांकरीता माहिती सल्लागारांची नियुक्ती करणेबाबत.......**

**महाराष्ट्र शासन**
**कौशल्य, रोजगार ,उद्योजकता व नाविन्यता विभाग**
**शासन निर्णय क्रमांक कौविउ-२०२२/प्र.क्र.९४/प्रशा-१**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २९ जुलै, २०२२.

वाचा:- १. शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग,क्र.मातंस ०८०/४/२०१४-O/O DIT, दिनांक ०९ मे, २०१९
२. विभागाचे पत्र क्र.कौविउ-२०२२/प्र.क्र.०१/कौशल्य-१, दिनांक १३ मे, २०२२

**प्रस्तावना: -**

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग व अधिनस्त कार्यालयांमार्फत कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता क्षेत्रात विविध उपक्रम आणि राज्यस्तरीय/केंद्रीय योजना राबविण्यात येतात. सामंजस्य करारांच्या माध्यमातून खाजगी क्षेत्रातील संस्थांचेही योजनांचे नियोजन, अंमलबजावणीसाठी सहकार्य घेण्यात येते. राबविण्यात येणारे विविध उपक्रम, योजनांचे नियोजन, अंमलबजावणीसाठी आवश्यक असणाऱ्या माहितीचे संकलन करणे, विविध सामंजस्य करार व धोरणांचा मसुदा बनविणे, कामकाज व वित्तीय व्यवहार ऑनलाईन पद्धतीने राबविण्यासाठी वेब पोर्टलचे व इतर संगणकीय कामकाज हाताळण्यासाठी विभाग (खुद्द) व अधिनस्त कार्यालयांमध्ये सल्लागारांची आवश्यकता भासते. त्यानुषंगाने, माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या संदर्भ क्र.१ येथील दिनांक ०९ मे २०१९ च्या शासन निर्णयानुसार विहित केलेल्या पद्धतीनुसार सूचीबद्ध संस्थांपैकी KPMG या संस्थेची ०२ वर्षांकरिता (एक वर्षानंतर कामगिरीच्या मूल्यमापनानंतर पुढील आणखी एक वर्षासाठी मुदतवाढ देण्याचे विचारात घेण्यात येईल) निवड करण्यात आलेली असून सदर संस्थेला संदर्भ क्र. २ येथील दिनांक १३ मे २०२२ रोजी कार्यादेश देण्यात आलेला आहे. यानुसार ०५ सल्लागारांची सेवा KPMG या संस्थेमार्फत घेण्याचे निश्चित करण्यात आले. त्यापैकी ०३ सल्लागारांच्या सेवा १७ मे, २०२२ पासून उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. तर उर्वरित २ सल्लागारांच्या सेवा KPMG या संस्थेने दिनांक ०१.०७.२०१५ पासून उपलब्ध करुन दिल्या आहेत. सदर सल्लागारांचे वेतन विभागाच्या ई-गव्हर्नन्स योजनेअंतर्गत अदा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

KPMG या संस्थेमार्फत नियुक्त करण्यात आलेले सल्लागारांचे पद व त्यांच्या वेतनाचा तपशिल पुढीलप्रमाणे-

| अ.क्र. | पद | उपलब्ध करुन दिल्याचा दिनांक | मासिक देय वेतन (माहिती व तंत्रज्ञान विभाग शा.नि. दिनांक ०९ मे २०१९ ) |
|---|---|---|---|
| ०१ | Managing Consultant | ०१.०७.२०२२ | ₹३,०६,९००/- |
| ०२ | Consultant (२) | १७.०५.२०२२<br>०१.०७.२०२२ | ₹ ४,९५,०००/- |
| ०४ | Senior Consultant (२) | १७.०५.२०२२ | ₹ ५,५४,४००/- |
| | | एकूण | ₹ १३,५६,३००/- |

२. KPMG या संस्थेमार्फत नियुक्त करण्यात आलेल्या सल्लागारांच्या वेतनाकरीता होणारा खर्च मागणी क्रमांक झेडए-२, २२३० कामगार व सेवायोजन, (०१)(०७) ई-प्रशासन, १७ संगणक खर्च, २२३० ६१०९ या लेखाशिर्षाखाली वेळीवेळी उपलब्ध होणाऱ्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२२०७२९१२२२३९३००३ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने

SANGEETA AJIT SHINDE

Digitally signed by SANGEETA AJIT SHINDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SKILL DEVELOPMENT ENTREPRENEURSHIP AND EMPLOYMENT DEPARTMENT, 2.5.4.20=ba607066e7a34e428b7c7c73de0f7e09a315a2af5075fd47f1e08389aa137b81, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=DDF4C16E4A3043BBAA409E4ECF901CA0490CE93C66913DE88A7769927FF5E261, cn=SANGEETA AJIT SHINDE
Date: 2022.07.29 12:26:06 +05'30'

**( संगीता अ. शिंदे )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) महालेखापाल (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)-१, मुंबई
२) प्रधान सचिव, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक
३) सह सचिव/उपसचिव, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग यांचे स्वीय सहाय्यक
४) अवर सचिव (रोखशाखा), कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग
५) अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई
६) Director, KPMG Advisory Services Pvt. Ltd., २nd Floor, Block T२(B wing), Lodha Excellus,Apollo Mills Compound, N.M. Joshi Marg, Mahalaxmi, Mumbai-४०० ००१
७) निवडनस्ती (प्रशा-१)